कोर्ट

पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस ठाणे ★ पुणे ★

**N.C.R.B** (एन.सी.आर.बी)
**I.I.F.-I** (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): पुणे शहर **P.S.**(ठाणे): हडपसर

   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0583 **Year** (वर्ष): 2026

   **Date and Time of FIR** (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):09/09/2026 08:17

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

   **Day**(दिवस): मंगलवार

   **Time Period** (कालावधी):

   **Date From** (दिनाक पासून): 08/09/2026
   **Date To** ( दिंनाक पर्यंत): 08/09/2026
   **Time From** (वेळेपासून): 20:42 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 23:02 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

   **Date** (दिनाक ): 08/09/2026 **Time** (वेळ): 23:00 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

   **Entry No.** (नोंद क्र.): 014

   **Date & Time** (दिनाक आणि वेळ): 09/09/2026 07:30 बजे

4. **Type of information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

   5.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):

   उत्तर, 1 किमी **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): 15 नं हडपसर पुणे, हडपसर, पुणे

   (c) In case, **outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश सत्यनारायण काबरा

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सी/702 युनीका सोसायटी, हडपसर,हडपसर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सी/702 युनीका सोसायटी, हडपसर,हडपसर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9067323334

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | कृष्णा जनार्दन बाबर | | | 1. के/ऑफ काटे यांची ईमारत,, व्टिन्स टवर शेजारी,,महादेव नगर, मांजरी, पुण,हडपसर,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 50,000/रुपये | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

50,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No.<br>(अ.क्र.) | UIDB Number<br>(यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी सुहास गणेशराव हट्टेकर, वय- 37 वर्षे, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, पुणे मो नं 9881873330मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहे. दि.08/09/2026 रोजी 17.00 वा मी लाचलुचपत प्रतिबधक विभाग, पुणे येथे हजर असतांना प्रशासन अधिकारी श्री.सतिश वाळके, पोलिस उप-अधिक्षक, ला.प्र.वि पुणे यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून तक्रारदार राजेश सत्यनारायण काबरा वय 57 वर्ष व्यवसाय कापड दुकान रा.सी/702 युनिका सोसायटी हडपसर पुणे यांची लाच मागणी बाबत तक्रार असुन आपण त्यांची तक्रार ऐकुन पुढील कायदेशिर कारवाई करा असे आदेशित केले. व सदर कारवाई करीत पुणे महानगरपालिका येथील पंच उपलब्ध करुन देत असलेबाबत सांगीतले. तसेच सापळा कारवाईकरिता अंमलदार मपो◌ाशि माकर, पोशि भुषण ठाकुर व चालक पोहवा काकडे हे देखील दिले. आम्ही तक्रारदार यांना व पंचाना आमचे कक्षात घेवुन जावुन गेले◌ा तेथे पंचाची नावे विचारली असता त्यांनी त्याची नावे 01)गणेश वसंत सपार वय 55 वर्ष, पद -वरिष्ठ लिपीक, वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालय पुणे महानगर पालिका 02)मेघा सुनिल जैद वय 46 वर्ष पद-वरिष्ठ लिपीक स्थानिक कर संस्था, पुणे महानगरपालिका असे सांगितले. त्यांची तक्रारदार राजेश सत्यनारायण काबरा व सापळा पथकातील अंमलदार,यांचेशी ओळख करून दिली. व ओळख करून घेतली. तक्रारदार यांनी त्यांची तक्रार तोंडी सांगितली. तसेच स्वहस्ताक्षरात लिहून दिली.ती थोडक्यात पुढीलप्रमाणे,

"तक्रारदार व त्यांची मुले यांचेविरुदध लोणी काळभोर पोलीस स्टेशन येथे गु.र.क्रं. 122/2026 भारतीय न्याय संहीता कलम 318(4), 316(2), 3(5) अन्वये दि. 19/03/2026 रोजी गुन्हा दाखल आहे. नमुद गुन्हयाचा तपास एपीआय कृष्णा बाबर, नेम.लोणी काळभोर पोलीस स्टेशन हे करीत आहेत. नमुद गुन्हयामध्ये तक्रारदार व मोठा मुलगा नामे रोहीत यास अटक होवुन जामीन मिळालेला आहे. व मुलगा नामे प्रतीक याचा अटकपुर्व जामीनासाठीचा अर्ज मा उच्च न्यायालयात केलेला असुन त्याची सुनावणी सुरु आहे.दि. 31/08/2026 रोजी नमुद गुन्हयाच्या तपासाच्या अनुशंगाने तक्रारदार हे एपीआय कृष्णा बाबर यांना भेटण्यासाठी लोणी काळभोर पोलीस स्टेशन येथे गेले त्यावेळी एपीआय कृष्णा बाबर यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना "तुमच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाचे चार्जशीट कोर्टात दाखल करायचे असेल तर 50,000/- रुपये व मुलाचा हाय कोर्टात जामीन करण्यासाठी मदत करण्याकरीता दोन लाख रुपये दयावे लागतील असे म्हणाले" त्यावर तक्रारदार त्यांना काहिएक न बोलता गुन्हयाबाबत चर्चा करुन निघुन आले. त्यानंतर एपीआय कृष्णा बाबर यांनी त्यांचा मो.क्रं. 9821967022 यावरुन तक्रारदार यांचेसोबत वारंवार व्हॉटसअ◌ॅप कॉलवर बोलणे करुन तक्रारदार यांचेकडे वरीलप्रमाणे पैशांची मागणी केलेली आहे. एपीआय कृष्णा बाबर यांनी मागणी केलेली रक्कम हि गुन्हयातील रक्कम नसुन तक्रारदार व त्यांचे कोणतेही आर्थीक व्यवहार नाही.लोकसेवक यांनी मागणी केलेली रक्कम हि लाच रक्कम असल्याने त्यांचेविरुध्द कारवाई होणेस विनंती आहे." याप्रमाणे तक्रार कथन केल्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरामध्ये सहीनिशी लिहून दिली.त्यानंतर पंचानी व आम्ही सदर लेखी तक्रार वाचून त्यावर सहया केल्या आहेत. सदर तकारीचे अनुषंगाने दिनाक 08/09/2026 रे◌ाजी तक्रारदार यांना एपीआय बाबर हे कॉल करुन मांजरी परिसरात भेटण्याकरिता येणार आहेत. तेव्हा तक्रारदार त्यांची भेट घेवुन बोलणी करणार असलेने दिनाक 08/09/2026 रे◌ाजी पडताळणी कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.दिनाक 08/09/2026 रे◌ाजी मी व पडताळणी पथक पंच व तक्रारदार असे कारवाईचे अनुषंगाने लाप्रवि कार्यालयात हजर असताना,तक्रारदार व पंचास शासकीय सोनी कंपनीचा व्हाईस रेकॉर्डर दाखवुन त्याबाबत माहीती दिली. एक नवीन सिलबद मेमरी कार्ड त्याचे वेस्टनातुन बाहेर काढुन पंचासमक्ष त्याची पाहणी केली असता, त्यावर बाजुसSanDisk Ultra 32 GB A1 micro SD HC I दुसरे बाजुस 5433DXCTQ086 MADE IN CHAINA असे छापलेले असल्याचे दिसुन आले. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकॉर्डरमध्ये बसविले आणि पंचांना व तक्रारदार श्री राजेश काबरा यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर

चालु करून मेमरीकार्डमध्ये यापुर्वी कोणतेही संभाषण ध्वनीमुद्रित नसल्याची खात्री करून दिली. तसेच निवेदन व सापळा कारवाईचे चित्रीकरण व्हिडीओ रेकॉर्डरमध्ये कारण्यात येणार असलेचे सांगुन शासकीय सोनी कपंनीचा व्हिडीओ कॅमेरा दाखविला व त्याकरिता वापरण्यात येणारे नवीन मेमरी कार्ड दाखविले त्यावर M ROCK चे मेमरीकार्ड इनसर्ट केले त्याचे पुढील बाजुस M ROCK micro SD HC 8GB व मागील बाजुस A2231 MI 220700467 MR-XY07/26 असे छापलेले होते.सदर मेमरी कार्ड व्हिडीओ कॅमेरामध्ये बसविले.व त्यामध्ये पुर्वीचे कुठलेही चित्रीकरण नसल्यांची खात्री करून दिली.व तो मपोशि माकर यांचे ताब्यात देवुन रेकॉर्डिंगबाबत सुचना दिल्या.

त्यानंतर तक्रारदार व पंच यांचे डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये निवेदन घेण्यात आले. त्याचे मपोशि माकर यांनी व्हिडीओ रेकॉर्डिग केले.तेव्हा 18.57 ते 19.03 वाजले होते. त्यानतर मी तक्रारदार व पडताळणी/सापळा पथकास पडताळणी कारवाई अनुषंगाने सुचना दिल्या.त्यानंतर माझे सुचनेप्रमाणे लाप्रवि कार्यालयात उपलब्ध असलेल्या सरकारी वाहन टीयुव्ही कार क्रमांक एम एच 12 आर.वाय. 7271 हीचे मध्ये सापळा कारवाईकरिता आवश्यक सर्व साहीत्य, प्रिटर, लॅपटॉप काळा कपडा सील साहीत्य ईत्यादी सर्व आवश्यक साहीत्य ठेवण्यात आले. पंच, पोशि/7934 वैशाली माकर,पोशि/7364 भुषण ठाकुर चालक पोहवा/330 काकडे असे सरकारी वाहनात बसलो. तक्रारदार हे त्यांचे स्कुटी क्रमांक. एम.एच. 12 डब्ल्यू.टी.0051 यावर बसुन आमचे मागोमाग लाप्रवि कार्यालयातुन निघाले. तेव्हा 19.30 वाजले होते. दोन्ही वाहने साधु वासवानी चौक- कॅम्प-फातिमा नगर - हडपसर- मांजरी मार्गे तक्रारदार यांचे दुकान रूबाबदार मेन्स वेअर मांजरी समोर थांबलो.आमचे पाठोपाठ तक्रारदारही थांबले तेथे मोठ्या प्रमाणात रहदारी असलेने तक्रारदार त्यांनी पुढील करवाईकरिता त्यांचे दुकान उपलब्ध करून दिलेने तेथे सर्वजण उतरून तक्रारदार यांचे दुकानात गेलो. त्यावेळी लोकसेवक एपीआय बाबर यांचा तक्रारदार यांना कॉल येवुन गेला असलेने पंचासमक्ष तक्रारदार यांनी 20.32 वा लोकसेवकास तक्रारदार यांचा मो क्र 9067323334 यावरून व्हॉटसअप कॉल केला.परंतु तो उचलला नाही व 20.38 वा लोकसेवक यांचा तक्रारदार यांना परत व्हाटसअप कॉल आला तो तक्रारदार यांनी उचलुन स्पीकर ऑन करून पंचासमक्ष लोकसेवक बाबर यांचेशी फोनवर बोलणी केली. लोकसेवक यांनी तक्रारदार यांना कानीफनाथ रसवंती गृहाजवळ येण्याबाबत सांगितले. सदर कॉल ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे.त्यानंतर मी व्हाईस रेकॉर्डर चालु करून होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री काबरा यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला कोणास दिसणार नाही अशा बेताने लावला. तक्रारदार श्री. काबरा व पंच क्र. 1 श्री. सपार यांना लोकसेवक एपीआय बाबर यांचेशी बोलणी करण्याकरिता कानीफनाथ रसवंती गृह, मगर कॉलेजचे जवळ मांजरी पुणे येथे रवाना केले. ती वेळ 20:42 वा. होती. आम्ही उर्वरित पडताळणी कारवाई पथक रूबाब मेन्स वेअर पासचे येथे थांबुन राहीलो.त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच क्रं 1 सापळा पथक थांबलेले ठिकाणी परत आले.मी तक्रारदार यांचेडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. तेव्हा 20.52 वाजले होते. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री गणेश सपार यांना पंच क्र 02 यांचेसमक्ष रवाना केल्यापासून येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री गणेश सपार यांनी सांगितले कि, "ते व तक्रारदार श्री काबरा असे पायी चालत कानीफनाथ रसवंती गृह मांजरी येथे गेले. तेथे लोकसेवक एपीआय बाबर येवुन थांबलेले होते. त्याना पाहून तक्रारदार यांनी डोळयाचे इशा-याने सांगितले.आम्ही तेथ गेले तेव्हा तक्रारदार यांनी नमस्कार बाबर साहेब म्हणुन बोलण्यास सुरूवात केली. त्यावेळी लोकसेवक बाबर यांनी मला बाजुला थांबण्याबाबत सांगितले.म्हणुन त्यांचेपासुन साधारण 10 फुटावर जावुन थांबलो. त्यावेळी एपीआय बाबर व तक्रारदार हे बोलत असलेचे मला दिसत होते. त्यांचे बोलणे झालेवर आम्ही दोघे सापळा पथक थांबले ठिकाणी आलो".अशी हकीगत सांगितली.त्यानंतर तक्रारदार काबरा यांना पंचासमक्ष हकीगत विचारली असता यांनी सांगितले कि, "ते व पंच क्र.1 असे आम्ही कानीफनाथ रसवंती गृह,मगर कॉलेजजवळ मांजरी येथे जावुन एपीआय बाबर यांना समक्ष भेटले. त्यांनी पंचाना बाजुला थांबण्यास सांगितले. ते त्यांचे बाजुलाच थांबले होते.तेथे तक्रारदार यांचे कामाबाबत चर्चा केली.त्यावेळी एपीआय बाबर म्हणाले कि, "उद्या मी हायकोर्टला चाललोय, चार्जशीट तिथ रिपोर्ट दयायच्या आधी हिथन.. हे तुमच झाली का तयारी" त्यावेळी तक्रारदार म्हणाले कि, "माझी सगळी तयारी झाली तुम्ही सांगितलेल्या पन्नासची माझी तयारी झाली. प्रतीकचे 2 मागताय हायकोर्ट बेलचे तुम्ही काही तरी करुन दया माझी एवढी ताकत नाय . मी उद्याच्या उद्या तुम्हाला मी सगळ पेमेंट आणुन देतो" त्यावर एपीआय बाबर म्हणाले कि,, "नाय ते आता आधीच ठरलेलय ते करा " त्यावर तक्रारदार एपीआय बाबार यांना म्हणाले कि, "ते पन्नास तुम्हाला आज देतो. उद्या उद्या सकाळ देतो." तेव्हा एपीआय बाबर म्हणाले कि,"नका उदयावरती " त्यावर तक्रारदार यांनी एपीआय बाबर यांना "तुम्ही प्रतीकच्या जामीनासहीत तुम्ही दोन लाख सांगताय जामिनाचे ये.. त्यात काय कमी जास्त करत नाय..उदयाच्या उदया दोन्हीच काम करुन देतो". असे विचारले. तेव्हां लोकसेवक बाबर म्हणाले कि, "एवढ नको मला अपेक्षा एवढ मी तस म्हणणार नाय." तेव्हा तक्रारदार म्हणाले कि, "हयातल सहकार्य काय करसाल तुम्ही आता मला सांगा उद्या

चार्जशीट उद्याच जर पेमेंट मिळाल तुम्हाला चार्जशीट किती दिवसात टाकसाल तुम्ही" तेव्हा लोकसवेक बाबर म्हणाले कि, "उदयाच टाकतो चार्जशीट तयार केल्यालय. तुमच्या ह्याच्या खातीर प्रश्न तो नाहीये.. हायकोर्टला रिपोर्ट जर माझा गेला". तेव्हा तक्रारदार यांनी "मग मी उदया जर दुपारी तुम्हाला पेमेंटच काम केल पन्नास हजार.. बाबर सर तुम्हाला देय चेयत ना पन्नास तुम्हाला उद्या दिले.प्रतीकचे किती घेणार हायकोर्टाचे तेवढ सांगा उदया दोन्ही एकत्र" अशी विचारणा केली असता लोकसेवक एपीआय बाबर तक्रारदार यांना म्हणाले कि, "एवढ लय एवढ स्पष्ट सगळ बोलत जावु नका ओ.. कोंडीगमध्ये बोलत जावा ना. अमांउटच कशाला सारख हे करताय..." असे तक्रारदार यांना सांगितले.त्यानंतर तक्रारदार हे पंच क्रमांक 01 यांचेसह सापळा पथक थांबेलल्या ठिकाणी परत आले. अशी हकीगत तक्रारदार यांनी पचंासमक्ष सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करुन दोन्ही पंचासमक्ष ऐकले असता, ते तक्रारदार व पंच क्रमांक 1 यांनी सांगितलेल्या हकिकती प्रमाणेच बरोबर व खरे असल्याची खात्री झाली. लोकसेवक एपीआय बाबर यांनी तक्रारदार यांचेविरुदध दाखल गुन्हयाचे दोषारोपपत्र लगेच मा न्यायालयात दाखल करण्याकरिता स्वत करिता 50,000/-रूपये लाचेची मागणी करून ती लगेच घेवुन येण्यास सांगुन स्वीकारण्याची तयारी दर्शविली असलेचे निष्पन्न झाले.त्याप्रमाणे सापळा कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार श्री काबरा यांना लोकसेवक एपीआय बाबर यांनी मागितलेली लाच रक्कम 50,000/- रूपये हजर करण्याबाबत सांगितले असता त्यांनी त्यंाचे बचतीतील रक्कम हजर केली. त्यात 500/-रूपये दराच्या 100 नोटा होत्या.सदर नोटांचे नंबर अंमलदाराचे मदतीने पंचासमक्ष कागदावर लिहून कागदावर पंचानी व मी सही केली. माझे सुचनेप्रमाणे चालक पोहवा काकडे यांनी तक्रारदार यांचे दुकानात तक्रारदार व पंच यांना अॅथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. व सदर 100 चलनी नोटांना रबर लावुन सर्व बाजुनी व आतमध्ये अॅथ्रॅसीन पावडर लावुन तक्रारदार यंाचे अंगात नेसणीस असलेल्या पॅन्टचे उजवे खिशात ठेवुन दिली.सापळा कारवाईचे अनुषगाने सर्वान पुन्हा सुचना द तक्रारदार श्री काबरा यांना लोकसेवक एपीआय बाबर यांनी मागितलेली लाच रक्कम 50,000/- रूपये हजर करण्याबाबत सांगितले असता त्यांनी त्यंाचे बचतीतील रक्कम हजर केली. त्यात 500/-रूपये दराच्या 100 नोटा होत्या.सदर नोटांचे नंबर अंमलदाराचे मदतीने पंचासमक्ष कागदावर लिहून कागदावर पंचानी व मी सही केली.माझे सुचनेप्रमाणे चालक पोहवा काकडे यांनी तक्रारदार यांचे दुकानात तक्रारदार व पंच यांना अॅथ्रॅसीन पावडरचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक करून दाखविले. व सदर 100 चलनी नोटांना रबर लावुन सर्व बाजुनी व आतमध्ये अॅथ्रॅसीन पावडर लावुन तक्रारदार यंाचे अंगात नेसणीस असलेल्या पॅन्टचे उजवे खिशात ठेवुन दिली.सापळा कारवाईचे अनुषंगाने सर्वान पुन्हा सुचना देवुन त्यानंतर तक्रारदार व पंच याचे सापळापुर्व निवेदन घेतले. त्याचे मपोशि माकर यांनी व्हिडीओ रेकॉर्डिंग केले तेव्हा 22.29 वाजले होते.त्यांनतर तक्रारदार यांनी एपीआय बाबर यांना भेटण्यासाठी कोठे यायचे याबाबत विचारणा करण्याकरिता तक्रारदार यंाचा मो.क्र. 9067323334 यावरून एपीआय बाबर यांचा मो.क्र.9821967022 यावर 22.43 वा.व्हॉटसअप कॉल करून स्पीकर ऑन करुन पंचासमक्ष बोलणी केली. तेव्हा तक्रारदार यांनी "पन्नास हजाराची अरेंजमेंट झाली.. कसं करायचं... कुठे येऊ" असे लोकसेवकास विचारले असता एपीआय बाबर यांनी "कुठे आहे तुम्ही अ.. कुठे येण शक्य तुम्हाला" असे विचारले. तेव्हा तक्रारदा यांनी तुम्ही सांगाल तेथे येत असे सांगितले तेव्हा लोकसवक यांनी "15 नंबरला या मग.. 15 नंबरला या.." कॉर्नरला त्या फुलवाल्याजवळ" येथे लाच रक्कम घेवुन येण्याबाबत सांगितले. सदर कॉल ध्वनीमुद्रीत करण्यात आला आहे.मी पुन्हा सर्वाना सुचना देवुन व्हाईस रेकॉर्डर चालु करुन होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार श्री काबरा यांचे शर्टचे आतील बाजूस बनियनला लावला. तक्रारदार श्री. बाबर व पंच क्र. 1 श्री. सपार यांना तक्रारदार यांची स्कुटी क्रमांक. एम एच 12 डब्ल्यू. टी. 0051 यावरून लोकसेवक एपीआय बाबर यांना 15 नंबर चौक मांजरी येथे भेटून लाच रक्कम देण्याकरिता रवाना केले. व आम्ही, पंच क्रमांक 02 सापळा पथकातील अंमलदार असे सरकारी वाहनामध्ये बसुन मगर कॉलेजपासुन त्याचे पाठोपाठ रवाना झालो. तेव्हा 22.53 वाजले होते. आम्ही उर्वरित सापळा कारवाई पथक काही अंतराने त्याचे मागोमाग 15 नंबर चौक मांजरी चे अलीकडे जावुन गाडीतुन उतरून शितलादेवी मंदीराचे समोर व आजुबाजुला काही अंतरावर सुरक्षित ठिकाणी थांबुन सापळा लावुन थांबुन राहीलो.सदर 15 नंबर चौक मांजरी शितलादेवी मंदीराचे समोरीलबाजुस श्रीकांत ट्रेडर्स या दुकानासमोर एक निळे रंगाची सियाझ कार क्रमांक एम एच 04 के डी 7879 ही थांबलेली होती त्यामध्ये तक्रारदार हे कारचा डावे बाजुचा दरवाजा उघडून बसले व तो दरवाजा उघडाच ठेवला होता.व पंच दरवाजच्या बाजुलाच उभे होते. काही वेळाने तक्रारदार यांनी कारमधुन उतरून डावे हाताने डोळ्याचा चष्मा काढून हातात धरून हात वर करून लोकसेवकाने लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला. मी तसेच पोशि ठाकुर, मपोशि माकर व पंच क्रमांक 02 लागलीच लोकसेवक यांचे सियाझ कारजवळ गेलो. तेथे पंच क्रमांक 01 यांना भेटलो. पंच क्रमांक 01 यांनी सदर कारचे चालक सीटवर बसलेले इसम हे एपीआय बाबर असलेचे संागितले. तेथे आम्ही तक्रारदार यंाचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केला. तेव्हा 23.02 वाजले होते.

लोकसेवक एपी◌आय बाबार यांना जागीच ताब्यात घेतले.त्यावेळी त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव - कृष्णा जनार्दन बाबर वय 45 वर्ष पद- सहा.पोलीस निरीक्षक नेमणुक - लोणी काळभोर पोलीस स्टेशन रा. फ्रॅट नंबर 305,टवीन टॉवर शेजारी,काटे यांची इमारत, महादेव नगर, मांजरी पुणे, असे सं◌ागितले.
त्यावेळी मपे◌ाशि माकर यांनी सुचनेप्रमाणे व्हिडीओ रेकर्डिग सुरु केले. तेव्हा पंचासमक्ष लोकसेवक एपी◌आय बाबर यांना लाच रक्कमेबाबत विचारणा केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तेव्हा पंच क्रमांक 01 श्री सपार यांना लोकसेवक बाबर यांनी लाच रक्कम कोठे ठेवली यांबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 01 यांनी सांगितले कि, ते बसलेल्या कारचे गिअर समोरील कप्प्यात ठेवली असे सांगितले. त्याप्रमाणे पंच क्रमांक 02 यांनी सदरचे कारचे गिअर चे समोरील कप्प्यातुन लाच रक्कम सर्वासमक्ष हजर केली. ती पंचासमक्ष पाहीली असता त्यामध्ये 500 रूपये दाराच्या नोटांचे 1 बंडल 50,000/- रूपये लाच रक्कम दिसुन आली. सदर लाच रकमेचे नोटाचा कारचे लाईट बंद करून कत्रिम अंधार करून अ◌ल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात पाहीले असता हस्तगत केलेल्या लाच रकमेच्या नोटांवर अ◌थ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसुन आली.त्यानंतर पंच क्रमांक 02 यांचेकडे यापुर्वी देण्यात आलेल्या कागदावर लिहेल्या नोटांचे नंबर व लाच रकमेतील प्रत्यक्ष नोटाचे नंबरची पाहणी केली असता ते एकच असल्याची खात्री झाली. त्यांनतर कारमध्ये पुन्हा कृत्रिम अंधार करून गिअर चे जवळील कप्प्याची पंचासमक्ष अ◌ल्ट्राव्हायलेट दिव्याने पाहणी केली असता तेथे अ◌ॅथ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली.तसेच पंच क्रमांक 02 यांचे हाताची पाहणी केली असता त्याचे दोन्ही हातावरचे तळव्यावर व बोटावर अ◌थ्रॅसीन पावडरची फिक्कट निळसर चकाकी दिसुन आली.तसेच तक्रारदार यांची अ◌ल्ट्राव्हायलेट दिव्याने पाहणी केली असता उजवे हाताचे तळावर बोटावर व पॅन्टचे उजवे खिशात व कडयावर अ◌थ्रॅसीन पावडरची चकाकी दिसुन आली. त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिग करण्यात आलेले आहे.त्यानंतर पंच क्रमांक 01 श्री सपार यांना रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि,ते व तक्रारदार काबरा असे तक्रारदार यांचे स्कुटी एम.एच.12 डब्ल्यु◌.टी.0051 यावर बसुन लोकसेवक एपीआय बाबर यांना बोलणी करण्याकरिता व लाच रक्कम देण्याकरिता रवाना झाली. आपण देखील आमचे मागोमाग येत होतात व आम्ही 15 नंबर चौक मांजरी येथे शितलादेवी मंदीराचे समोर श्रीकांत ट्रेडर्सचे समे◌ार जावुन स्कुटीवरून खाली उतरलो. तेथे लोकसेवक एपीआय बाबर हे निळे रंगाचे सियाझ कार क्रमाक एम एच 04 के डी 7879 मध्ये चालक सीटवर बसलेले होते. त्यांनी तक्रारदार यांना इशा-याने कारमध्ये बसण्यास सांगितले तक्रारदार हे डावे बाजुचे समे◌ारील सीटवर बसले व मी देखील बाजुलचा उभा राहीलो तेव्हा लोकसेवक यांनी मला बाजुला थ◌ाबण्याबाबत सं◌ागितले.मी तेथेच थांबुन होतो व तक्रारदार यांनी कारचा दरवाजा उघडचा ठेवुन लोकसेवकाशी बोलत होते ते मी पाहत होते◌ा.व मला ते दिसत होते.तक्रारदार यांनी त्यांचे पॅन्टचे खिशातुन लाच रक्कम काढून गाडीचे गिअरजवळ ठेवली. काही वेळाने तक्रारदार कारमधुन उतरून तक्रारदार यांनी डावे हाताने डोळ्याचा चष्मा काढून हातात धरून हात वर करून लोकसेवका◌ाने लाच रक्कम स्वीकारलेबाबत पुर्वनियोजित इशारा केला व आपण लगेच कारजवळ येवुन लोकसेवक एपीआय बाबर यांना ताब्यात घेतले.अशी हकिगत सांगितली.त्यांनतर तक्रारदार श्री बाबर याना पंचसमक्ष रेकॉर्डर लावलेपासुन बंद करेपर्यत काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी सांगितले कि,"ते व पंच 01 श्री सपार असे त्याचे स्कुटीवरून 15 नंबर चौक श्रीकांत ट्रेडर्स समोर स्कुटी थांबवुन उतरलो. तेथे लोकसेवक एपीआय बाबर हे निळे रंगाचे सियाझ कार क्रमाक एम एच 04 के डी 7879 मध्ये चालक सीटवर बसलेले होते. त्यांनी मला इशा-याने कारमध्ये बसण्यास सांगितले. मी डावे बाजुचे समे◌ारील सीटवर बसलो.तेव्हा लोकसेवक एपीआय बाबर यांनी पंचाना बाजुला थांबण्यास सांगितले.परंतु पंच माझे बाजुलाच दरवाज्याजवळ थांबुन होते. व आमचेकडे पाहत होते.त्यांनतर लोकसेवक म्हणाले कि, "ठेवुन द्या ते माग.. सकाळी.. मला बी सकाळी लवकर उठ.. असू द्या... मी बी तिकडूनच आलोय बर झाल फोन आले एसीपी ऑफिसला गेलतो" असे सांगितले.त्यावेळी तक्रारदार यांनी "बर.. आता तुम्ही सांगितल्या प्रमाण 50 च.. 50 हजाराच काम केलं" असे एपीआय बाबर यांना बोलेले असता एपीआय बाबर यांनी "त्यांना सांगा की राव.. काय..". असे पंचास बोलेल. त्यानंतर तक्रारदार "बर तुम्ही सांगितल्याप्रमाणे 50 हजाराच काम केलं बाबर साहेब.. आता पुढं कशी रूपरेषा तुम्ही सांगा" असे एपीआय बाबर यांना बोलेले असता एपीआय बाबर यांनी "इकडे बघा.. आता तुमच्या ह्याचा.. कोर्टाला चार्जशीट गेलेला आहे.. असं रिपोर्ट जाईल.. त्याच्या एंट्रीमला मिळेल.. कारण इकड बघा पोलीसांचा.. चारशीट कधी टाकतो माणूस पोलीसांचा तपास संपल्यावर.. मग पोलीसांचा तपास पूर्ण झाला आहे.." असे तक्रारदार यांना सांगितले.त्यानंतर लोकसेवक बाबर यांनी "ठेवा इथे.. (गेअर च्या समोरील कप्प्याकडे हाताच्या इशा-याने ) सांगितले तेव्हा तक्रारदार यांनी "कुठं डिककीट ठेवू का? नाय त्या हेच्यात ठेवू का डिकीट.. घ्या मोजून घ्या.." असे सांगितले. तेव्हा लोकसेवक बाबर यांनी "नाय नाय" असे सांगितले.तेव्हा तक्रारदार यांनी "घ्या मोजून परत नाही.. परत विषय नको शेठ.. 50 हजार आहेत ते मोजून घ्या ना तुम्ही.. आता ते स्टेरिंगचे इथे कसे राहतील ते डिकीत टाकू का" असे

विचारले.असता लोकसेवक बाबर यांनी "आलं का लक्षात (हाताचे बोट गेअर च्या समोरील कप्याकडे दाखवुन इशारा केला ) असे बोलून लाच रक्कम कारचे गिअर बॉक्सचे समोरील कप्यात ठेवण्यास सांगितलेने मी लाच रक्कम माझे उजवे हाताने पॅन्टचे उजवे खिशातुन काढून लोकसेवक बाबर यांचे सांगणेप्रमाणे सदर ठिकाणी ठेवली.त्यानंतर मी कारचे बाहेर येवुन लाच रक्कम स्वीकारलेबाबत डावे हाताने डोळ्याचा चष्मा काढून हातात धरून हात वर करून पुर्वनियोजित इशारा केला. त्यांनंतर एपीआय बाबर यांना पंचासमक्ष ताब्यात घेतले. अशी हकीगत सांगितली. त्यंानतर आम्ही पंचासमक्ष ध्वनीमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता तक्रारदार व पंचानी सांगितलेप्रमाणे हकीगत बरोबर आहे. सदर झाले कारवाईचा सविस्तरपणे पंचनामा करण्यात आलेला आहे. व मेमरी कार्डच्या हॅश व्हॅल्यू घेण्यात आल्या आहेत.

तरी आरोपी लोकसेवक एपीआय कृष्णा जनार्दन बाबर 45 वर्ष पद- सहा.पोलीस निरीक्षक, नेम - लोणीकाळभोर पोलीस स्टेशन रा.फ्लॅट 305,काटे यांची इमारत,टवीन टॉवर जवळ,महादेव नगर,मांजरी पुणे यानी दिंनाक 08/09/2026 रोजी कानीफनाथ रसवंतीगृह,मगर कॉलेज गेटजवळ, मांजरी, पुणे येथे 20.42 ते 20.52 वा. चे दरम्यान झालेल्या पडताळणी कारवाईदरम्यान तक्रारदार यांचेविरूदध लोणीकाळभोर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हा नोंद क्रमांक 122/2026 या गुन्हयाचे लगेच दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्याकरिता व तक्रारदार यांचे मुलाचे जामीनात मदत करण्याकरिता म्हणुन स्वत करिता तडजोडीअंती तक्रारदार यांचेकडे 50,000/रूपये ( पन्नास हजार रूपये ) लाचेची मागणी केली.व स्वत स्वीकारण्याची तयारी दर्शवली. व दिंनाक 08/09/2026 रोजीच लाच रक्कम घेवुन येण्याबाबत सांगितले. 22.52 ते 23.02 वा चे दरम्यान झालेल्या सापळा कारवाई दरम्यान 50,000/-रूपये (पन्नास हजार रूपये ) लाच रक्कम सियाझ कार क्रमांक एम. एच. 04 के. डी. 7879 मध्ये स्वत ठेवण्यास सांगुन स्वीकार केला असता त्यांना ताब्यात घेण्यात आले. कृष्णा जनार्दन बाबर 45 वर्ष पद- सहा.पोलीस निरीक्षक, नेम - लोणीकाळभोर पोलीस स्टेशन पुणे यांनी सरकारी पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार व त्यंाचे मुलाविरूदध दाखल गुन्हयामध्ये लवकर दोषारोपपत्र दाखल करण्याकरिता व जामीनाकरिता मदत करण्यारिता म्हणुन स्वत करिता 50,000/-रूपये (पन्नास हजार लाख रूपये ) लाच रक्कम मागणी करू.न ती स्वतचे कार क्रमांक एम. एच. 04 के. डी 7879 मध्ये स्वीकारली. म्हणुन लोकसेवक एपीआय कृष्णा जनार्दन बाबर 45 वर्ष पद- सहा.पोलीस निरीक्षक, नेम - लोणीकाळभोर पोलीस स्टेशन रा.फ्लॅट 305,काटे यांची इमारत,टवीन टॉवर जवळ,महादेव नगर,मांजरी पुणे याचेविरूदध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 अन्वये सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

HEMANT CHANDRAKANT PATIL(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

ठाणे अंमलदार
हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): HEMANT CHANDRAK

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

9/9/26

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( if known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)